**दिनांक 02.03.2023 मा. विभागीय आयुक्त, कोकण यांचे अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या 38 व्या बैठकीची विषयसूची. (वेळ 01.00 वाजता)**

1. **मागील बैठकीचा आढावा.**

| अ.क्र | विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | महानगरपालिके अंतर्गत पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करणेबाबत. | • **ठाणे, पनवेल महानगरपालिके** अंतर्गत पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करुन त्याबाबतची माहिती सदस्य सचिवांकडे प्राप्त झाली आहे.<br>• उर्वरित **बृहन्मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निझामपूर, उल्हासनगर महानगरपालिका** यांनी समित्या गठीत करुन त्याबाबतची माहिती दि.३०.०६.२०२२ पर्यंत समितीचे सदस्य सचिव यांचेकडे सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्या दि.०७.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित महानगरपालिका यांना समित्या गठीत करुन माहिती पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>• **परंतु अद्यापही माहिती अप्राप्त आहे.** | 1.आयुक्त, बृहन्मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निझामपूर, उल्हासनगर महानगरपालिका. |
| 2 | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत. | • समितीने पाणथळ समितीच्या बैठकीसाठी नेमलेले प्रतिनिधी / नोडल अधिकारी समितीच्या बैठकीत उपस्थित राहत नसल्यामुळे समितीकडे प्राप्त तक्रारींवर कार्यवाही करण्यात अडथळे येतात. त्यामुळे तक्रारींचे निराकरण करण्यास विलंब होत असल्याने मा. अध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.<br>• समितीचे सदस्य तथा पाणथळ तज्ञ डॉ. महेश शिंदीकर यांना देय असलेल्या भत्यांची वेळेवर पुर्तता होत नसल्याने समितीच्या कामकाजामध्ये भरीव योगदान करण्याकरिता असमर्थता व्यक्त केली. हया बाबीचे श्री. स्टॅलिन, संचालक, वनशक्ती संस्था यांनी देखील समर्थन केले. डॉ. शिंदीकर यांचे समितीच्या कामकाजामध्ये भरीव योगदान मिळण्यासाठी समितीचे सदस्य अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई, यांनी ही अडचण दूर करण्यासाठी कांदळवन प्रतिष्ठानामार्फत डॉ. शिंदीकर यांचे भत्ते अदा करण्याचे आश्वासन दिले होते. | 1. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका अथवा आयुक्त, संबंधित महानगरपालिका<br>2. संचालक, पर्यावरण विभाग<br>3. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | पाणथळ तक्रार निवारण समितीसाठी टोल फ्री क्रमांक सुरु करणेबाबत. | • पाणथळ क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने नागरीकांना पाणथळ क्षेत्राचा होणारा ऱ्हास, अतिक्रमण व भराव झाल्यास त्याची तक्रार संबंधीत यंत्रणेकडे त्वरीत करता यावी, यासाठी टोल फ्री क्रमांकाची सेवा संचालक, पर्यावरण विभाग यांनी उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी पर्यावरण विभागातील पूर्ण वेळ जबाबदार कर्मचाऱ्याची नियुक्ती करुन समितीस दि.१५.०७.२०२२ पर्यंत अवगत करण्याच्या व सदर टोल फ्री क्रमांक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्यास सांगितले होते.<br>• त्या अनुषंगाने सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्या दि. ०७.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>• **परंतु अद्यापही माहिती अप्राप्त आहे.** | 1. संचालक, पर्यावरण विभाग |
| 4 | डेब्रिस हटवून इतरत्र निश्चित ठिकाणी टाकण्याबाबत. | • डेब्रिज डंप करणेकरीता योग्य ठिकाण निश्चित करण्यासाठी वनशक्ती यांचे प्रतिनिधी, महसूल, सिडको किंवा संबंधीत यंत्रणा आणि वन विभाग यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन ठिकाण निश्चित करण्याचे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले होते.<br>• वनशक्ती यांच्या प्रतिनिधींनी ठाणे व रायगड जिल्हयातील बंद पडलेल्या खाणींचे महसूल विभाग (किमान तहसिलदार दर्जाचे) व वन विभाग यांच्या (किमान वनक्षेत्रपाल दर्जाचे) प्रतिनिधींद्वारे ठिकाण निश्चित करण्यासाठी पाहणी करावी असे सुचविले होते. त्यास मा. अध्यक्षांनी मान्यता देऊन त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.<br>• **तथापी कार्यवाही अजूनही प्रलंबित आहे.** | 1. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका अथवा आयुक्त, संबंधित महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी महसूल विभाग, सिडको किंवा संबंधीत यंत्रणा व वन विभागाचे प्रतिनिधी, वनशक्ती |

# कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीमधील प्राप्त तक्रारी

| अ.क्र | तक्रारदार व तक्रारींचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | **श्री. स्टॅलीन डी. (WC- 73)**<br>Destruction of wetlands & near Bhakti Park Mono Rail station & nearby areas in Wadala.<br>Date :- 31.01.2019 | • उपनमक आयुक्त कार्यालय, बेलार्ड ईस्टेट, मुंबई यांच्या दि.14.10.2022 रोजीच्या अहवालानूसार वडाळा सॉल्ट पॅन विभागातील, सॉल्ट पॅन जमीन ही भारत शासनाच्या अखत्यारीत आहे. सदर अहवालानूसार डेब्रिज हटवण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून (MCGM) करण्यात यावी. त्यासंदर्भात त्यांच्याशी अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला आहे, परंतु अद्यापही त्यांच्यामार्फत तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.<br>• मीठ उपअधीक्षक, वडाळा यांचे मार्फत वडाळा पोलीस स्टेशनमध्ये FIR No. 265/2020 व No. 358/2021 अन्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन, पोलीसांद्वारे पुढील कार्यवाहीच्या प्रतिक्षेत आहे. तसेच कांदळवन कक्षाद्वारे गुन्हेगारांविरुध्द FIR दाखल करण्यात यावी असे सूचित केले आहे. मात्र, अशा बेकायदेशीर कामांवर कारवाई करण्यासाठी मिठागरे विभागामार्फत आवश्यक ती पावले उचलत आहोत. जून 2022 मध्ये, MCGM आणि वन विभागाच्या मदतीने (कांदळवन कक्ष) वडाळा येथे जमीनदोस्त करण्याची मोहीम राबविण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | 1. उप आयुक्त, सॉल्ट विभाग<br>2. जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर | **अहवाल प्राप्त** |
| 2 | **श्री. स्टॅलिन डी (WC- 81)**<br>Reclamation of Wetlands on the Left side of Kharigaon Toll Plaza as one drives from Thane to Kalyan.<br>Date - 20.01.2020 | • ठाणे महानगरपालिका यांचे दि.21.07.2022 रोजीच्या अहवालानुसार सदर जागा वनविभागाच्या अधिपत्याखाली असून, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या विभागातर्फे कोणतेही फलक अथवा सिक्युरिटी गार्ड तेथे उपलब्ध नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात तेथे भरणी होते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भरणी काढण्याबाबत महानगरपालिकेला आदेश दिले जातात. भरणी काढण्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने महापालिका स्तरावर त्याबाबत जास्त कालावधी लागत असल्याचे नमुद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | 1.आयुक्त, ठाणे महानगरपालिका<br>2. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक | **अहवाल प्राप्त** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | **श्री. दामोदर शिंगडा** (WC- 86) वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ मधील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ जागेतील तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत. Date - 26.12.2022 | • मा.अध्यक्षांनी पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांना दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने वसई-विरार महानगरपालिका यांचेकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे. | 1.आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी पालघर<br>3. उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, पालघर | **अहवाल अप्राप्त** |
| 4 | **श्री.स्टॅलिन डी.** (WC- 87)<br>Destruction of coastal Wetlands in Kharghar Sector 16.<br>Date - 05.01.2021 | • सिडको यांच्या प्रतिनिधींनी तक्रारदारासोबत स्थळ पाहणी करावी. तक्रारीत नमूद असलेले पक्षांना प्रतिबंध करणारे Bird Nets काढून टाकावे तसेच पाणथळ जागेवर विपरीत परिणाम करण्याऱ्या बाबींवर आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करुन अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने सिडको कार्यालयाकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे. | 1. व्यवस्थापकीय संचालक, सिडको | **अहवाल अप्राप्त** |
| 5 | **श्री. सुनील अगरवाल** (WC- 92)<br>Mangroves and Wetlands destruction near Hiranandani Estate Thane. Date - 04.12.2021 (कांदळवन समितीकडून वर्ग) | • मा. अध्यक्षांनी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांना तात्काळ अहवाल सादर करण्याच्या निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दि.30.09.2022 तसेच दि.08.12.2022 रोजीच्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे | **अहवाल अप्राप्त** |
| 6 | **श्री. निलेश विनायक जोशी** (WC- 95) पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area - No Development Zone मधील बांधकाम अनधिकृत यादीत नसल्याबाबतची तक्रार.<br>Date - 21.12.2021 | • सदर विषय पर्यावरण विभागाशी संबंधित असल्याने मा. अध्यक्षांनी या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यासाठी तक्रार संचालक, पर्यावरण विभाग यांचेकडे वर्ग करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्याअनुषंगाने सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दि.27.07.2022 तसेच दि.08.12.2022 रोजीच्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. | 1. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई<br>2. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका<br>3. जिल्हाधिकारी पालघर | **अहवाल अप्राप्त** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | **Swacch Nagpur (WC- 98)**<br><br>Gross violations in wetland conservation rules and others in construction of Viewers gallery, parking plaza & so-called beautification project on Futala (Telangkhedi) lake in Nagpur<br><br>Date - 17.05.2022 | • समितीने सदरचे क्षेत्र हे नॅशनल ॲटलास मधील पाणथळ क्षेत्र असल्याने या संदर्भात जिल्हाधिकारी, नागपूर यांना उचित कार्यवाही करुन अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>त्याअनुषंगाने सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फेत दि.27.07.2022 रोजीच्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्याआहेत. | 1. जिल्हाधिकारी, नागपूर | **अहवाल अप्राप्त** |
| 8 | **श्री. सुनील अगरवाल. (WC- 96)**<br><br>Violation of CRZ rules & Indian Wildlife Protection Act in Sector 60, Nerul Navi, Mumbai. Date – 24.09.2022. | • सिडको यांच्या दि.30.11.2021 रोजीच्या अहवालानुसार या तक्रारीप्रमाणे NRI (नेरुळ) येथील वसाहती जवळील प्रस्तावित गोल्फ कोर्स जागेजवळील भूखंडाची तक्रारदारांच्या समवेत दि.11.11.2021 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून सिडको महामंडळाच्या विकास आराखडयाप्रमाणे सदरहू जागा गोल्फ कोर्स प्रकल्पासाठी प्रस्तावित आहे. त्या पॉकेट मधील D व E भागात कोणत्याही प्रकारचे काम चालू नाही व काही भागात पाणी साठलेले आहे. त्या पाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भराव केलेला नाही तसेच सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झालेले नाही.<br>• **सदरची तक्रार ही सुप्रिम कोर्टात देखील चालू आहे.**<br>• समितीने या तक्रारीबाबत MCZMA यांना उचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. | 1. संचालक, पर्यावरण विभाग | **अहवाल अप्राप्त** |

**नवीन तक्रारी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | **श्री. स्टॅलिन डी – (WC- 100)**<br><br>Wetlands already eliminated in defiance of court orders to protect and ones that are presently being destroyed.<br><br>Date -12.07.2022. | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.02.11.2022 रोजीच्या अहवालानूसार **मौजे पाणजे**, ता.उरण, जि. रायगड येथील जागा वेटलँड नियम, 2010 नुसार वेटलॅंडच्या यादीत समाविष्ट **नाही.** तसेच पाणथळ म्हणून अधिसूचित केलेली **नाही.**<br>• तसेच **मौजे भेंडखळ**, **मौजे बोकडविरा**, **मौजे सावरखार**, **मौजे जासई**, ता.उरण, जि.रायगड येथील जागा वेटलँड नियम, 2010 नुसार वेटलॅंडच्या यादीत समाविष्ट **आहे**. परंतु पाणथळ म्हणून अधिसूचित केलेली **नाही.**<br>• त्याअनुषंगाने समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. उपवनसंरक्षक अलिबाग, जि.रायगड | **अहवाल प्राप्त** |
| 2 | **श्री. स्टॅलिन डी – (WC- 101)**<br><br>Please Stop Reclamation and destruction of belpada Wetland. Date – 28.09.2022 | • सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दि.04.10.2022 तसेच दि.16.12.2022 रोजीच्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. | 1. जिल्हाधिकारी, रायगड | **अहवाल अप्राप्त** |
| 3 | **श्री. स्टॅलिन डी – (WC- 102)** Blockage of tide water by CIDCO in Survey Number 265 Nerul. Date – 08.10.2022. | • सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दि.12.10.2022 रोजीच्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. | 1. मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. जिल्हाधिकारी, ठाणे | **अहवाल अप्राप्त** |
| 4 | **श्री. बी.एन.कुमार – (WC - 103)**<br><br>10 acres of Kharghar wetland systematically buried<br>Date : 04.01.2023. | • सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दि.10.01.2023 रोजीच्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. | 1. मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका<br>2. मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. जिल्हाधिकारी रायगड | **अहवाल अप्राप्त** |
| 5. | **श्री.निशांत बांगेरा – (WC - 104)**<br>Reclamation of Railadevi Lake, Thane | • सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दि.22.02.2023 रोजीच्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. | 1. मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन | **अहवाल अप्राप्त** |